| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHJN040018672011 | दाखल दिनांक | : | ०९ | ११ | २०११ |
| | नोंदणी दिनांक | : | ०९ | ११ | २०११ |
| | निकाल दिनांक | : | १६ | ०७ | २०२६ |
| | कालावधी | : | ११ व. | ८ म. | ७ दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.१, अंबड यांचे न्यायालयात**
(पिठासीन न्यायाधीश – एस.एस. जैन )

**नि. फौ. ख. क्र.५००४९१/२०११** **निशाणी क्र.४१**

(प्रथम खबर अहवाल क्रमांक – ६५/२०११)
(अपराध कलम – भा.दं.वि. चे कलम ३२४ ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र, पोलीस ठाणे – अंबड)

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस ठाणे, अंबड
ता.अंबड, जि. जालना. ... **अभियोग पक्ष**

**श्री. बी. ई. निकम सहा. सरकारी अभियोक्ता**

**– विरुध्द –**

१. किसन बंसी राठोड, वय–३५ वर्षे,
२. विमल किसन राठोड, वय – ३० वर्षे,
दोघे रा. बक्षाची वाडी, ता. अंबड,
जि. जालना **... आरोपी**

**श्री. एस. एन. शेळके आरोपींचे विधीज्ञ**

| | |
|---|---|
| अपराध दिनांक | १७.०४.२०११ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १७.०४.२०११ |
| दोषारोपपत्र दिनांक | ०९.११.२०११ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | २२.०९.२०१७ |
| पुरावा आरंभ झाल्याची दिनांक | २५.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाची राखीव दिनांक | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | १६.०७.२०२६ |
| शिक्षा लादलेली असल्यास दिनांक | निरंक. |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष किंवा दोषी | लादलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | किसन बन्सी राठोड | २५.०४.२०११ | २५.०४.२०११ | भा.दं.वी चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे. | निर्दोष | निरंक | --- |
| २. | विमल किसन राठोड | २५.०४.२०११ | २५.०४.२०११ | | निर्दोष | निरंक | --- |

**अ. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी :-**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ.सा.-१ | दिगंबर दगडू राठोड (नि.क्र.३८) | पंच साक्षीदार |

**ब. आरोपीच्या साक्षीदारांची यादी** :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

**क. न्यायालयीन साक्षीदार** :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

**निशाणी क्रमांकाची यादी :-**

**अ. अभियोगपक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | -- | -- |

**ब. बचावपक्ष** :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| - | -- | -- |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | २४ | दोषारोप |
| २. | २५ व २६ | दोषारोपावरील आरोपींचे निवेदन |

## ड. मुद्देमाल :

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | मु.नं.६६/२०११ | एक कु–हाड लोखंडी पाटयाची तीन फुट लांबीचा दांडा असलेली. |

**न्यायनिर्णय**
(दिनांक १६/०७/२०२६)

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

फिर्यादी गबरू फुलसिंग राठोड हे दिनांक १७.०४.२०११ रोजी संध्याकाळी ४.३० वाजेच्या सुमारास घरी असतांना त्यांचा मुलगा भरत हा शेतातून घरी आला व त्याने सांगीतले की, त्यांचा चूलतभाउ आरोपी क्र.१ किसन बन्सी राठोड याने त्यांच्या बांधावरील कूपाट जाळली म्हणून तो त्यांना बोलायला गेला असता त्यांनी त्याला शिवीगाळ केली. आरोपी क्र.१ किसन व त्याची पत्नी आरोपी क्र.१ विमल असे संध्याकाळी त्यांच्या घरासमोर आले असता फिर्यादीने त्यांना विचारले की, बांधावरील कुपाट का जाळली व त्यांच्या मूलास शिवीगाळ का केली तेव्हा आरोपी क्र.१ याने त्यांना शिवीगाळ केली व "माझ्या शेतातील काडी कचरा जमा करून जाळला" असे म्हणुन फिर्यादीच्या अंगावर आला तेव्हा फिर्यादीचा मुलगा भरत हा सोडवण्यास आला असता आरोपी क्र.१ याने कु–हाडीच्या तुंबटण्याने भरतच्या डोक्यात मारहाण केली तसेच, फिर्यादीलाही तुंबटण्याने मारहाण करून जखमी केले. फिर्यादीची सून त्यांना सोडवण्यास आली असता आरोपी क्र.२ ने तिला धक्काबुक्की केली व शिवीगाळ केली. फिर्यादी व त्याचा मुलगा भरत यांना दुखापत झाल्याने त पाचोड येथील सरकारी दवाखाण्यात गेले व उपचार घेवून त्यांनी अंबड पोलीस स्टेशन येथे आरोपींविरूध्द फिर्याद दाखल केली.

२. या आशयाच्या फिर्यादवरुन गुन्हा क्र.६५/२०११ प्रमाणे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये पोलीस स्टेशन, अंबड येथे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी गुन्हयाचा तपास करून

घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला व जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व संबंधीत साक्षीदाराचे जाबजबाब नोंदवुन तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र न्यायप्रविष्ट केले.

३. आरोपींविरूध्द भा.द.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये निशाणी क्र.२४ वर दोषारोप निश्चित केला व तो आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगीतला असता त्यांनी तो कबूल नसल्याचे सांगीतले व खटला चालवावा असे प्रतिपादन केले. आरोपींविरुध्द दोषाहार्य पुरावा मिळुन न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अंतर्गतचे बयान वगळण्यात आले.

४. दोन्ही पक्षांच्या वतीने करण्यात आलेला युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रकरणातील वस्तुस्थिती व सादर पुरावा यावरुन पुढील मुद्दे या न्यायालयाच्या विचारार्थ उपस्थित झाले असून त्या मुद्दयांची कारणमिमांसा त्या त्या मुद्दयांसमोर निष्कर्षासहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.१७.०४.२०११ रोजी १६.३० वाजेच्या सुमारास मौजे बक्षाची वाडी, ता. अंबड, जि. जालना येथे आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदारास कू–हाडीच्या तूंबटण्याने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत केली व त्याव्दारे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदारास मारहाण करून दुखापत केली आणि त्याव्दारे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२३ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन अपमानित केले व त्याव्दारे | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | |
| ४. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे मारण्याची धमकी दिली व त्याव्दारे भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | <u>नकारार्थी</u> |
| ५. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

५. अभियोग पक्षातर्फे जप्ती पचं – साक्षीदार क्र.१ दिगंबर दगडू राठोड यांची साक्ष (नि.क्र.३८) वर नोंदविण्यात आली. याउलट आरोपींनी कोणताही लेखी अथवा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

**<u>मुद्दे क्र.१ ते ५ बाबत</u>:**

६. भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे आरोपीविरुध्द लावण्यात आलेल्या गुन्हयाच्या शाबीतीकरिता अभियोगपक्षाला सबळ पुराव्यानिशी, आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना कू–हाडीच्या तुंबटण्याने मारहाण केली व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली, या बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

७. अभियोग पक्षातर्फे फिर्यादीचा मुलगा दिंगबर राठोड यांची साक्ष (नि.क्र.३८) नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये फिर्यादी त्यांचे वडील व आरोपी हे त्यांचे नातेवाईक आहेत व त्यांच्यामध्ये घरगूती वाद असल्याचे कथन केले व जप्ती पंचनाम्यावरील सही मान्य केली परंतु, त्यातील मजकूर माहित नसल्याचे सांगीतले. तसेच, साक्षीदाराने स्वत: सांगीतले की, आता आरोपी व फिर्यादीमध्ये कोणतेही वाद राहिलेले नाही.

८. सदर प्रकरणी फिर्यादीस समन्स मिळून देखील ते साक्षकामी हजर राहिलेले नाहीत. साक्षीदार क्र.१ चा पूरावा लक्षात घेता असे निदर्शनास येते की, वाद संपूष्टात आल्यामुळे फिर्यादीला खटला चालवण्यास स्वारस्य राहिलेले नाही.

९. प्रकरणाच्या दृष्टीने फिर्यादीचा तोंडी पुरावा हा निर्णायक स्वरुपाचा होता. परंतु, फिर्यादीच्या अनुपलब्धतेमुळे आवश्यक तो पूरावा अभिलेखावर आला नसल्याने आरोपी निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मी मुद्दा क्रमांक १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.५ च्या बाबतीत पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

०१. आरोपी क्र.१ किसन बंसी राठोड व आरोपी क्र.२ विमल किसन राठोड, यांना भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वयेच्या दोषारोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

०२. आरोपींची जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

०३. जप्त मूद्देमाल (मु.नं. क्र.६६/२०११) एक कु–हाड जुनी वापरती लोखंडी पाटयाची, तीन फुट लांबीचा दांडा असलेली, ही मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावी.

०४. आरोपींनी फौ.प्र.सं.चे कलम ४३७–अ च्या पूर्ततेकामी प्रत्येकी रूपये १५०००/– चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SIMA SACHIN JAIN
Date: 2026.07.16 17:22:25 +0530

दिनांकः १६/०७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.१),
अंबड

<u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :- एस. एम. सपकाळ
न्यायालयाचे नाव :- प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, अंबड
पी.डी.एफ.दिनांक :- १६/०७/२०२६

स्वा/-
लघुलेखक